दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -९५ बुधवार,दि.११ डिसेंबर २०२४ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-95 | Wednesday, Dt.11 December 2024 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

## महाविद्यालयीन तरुणीची आत्महत्या



अंबड/प्रतिनिधी

शहरातील शारदानगरसमोरील मुंदडा कॉम्लेक्सच्या बाजुला राहत असलेल्या भाग्यश्री सुरेश घाडगे (वय १६ वर्षे) या महाविद्यालयीन तरुणीने छेडछाडीला कंटाळून आज (ता.१०) मंगळवारी ९ वाजेच्या सुमारास राहत्या घरी

(उर्वरीत पान २ वर)

# मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख खुन प्रकरणी संतप्त आंदोलकांचे दिवसभर ठिय्या आंदोलन


## आंदोलनाला हिंसक वळण वाहनावर दगडफेक करीत बस पेटवली

### मुख्य आरोपी अटक होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही आंदोलकांचा पवित्रा

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथे असलेल्या पवनचक्की खंडणी प्रकरणावरुन झालेल्या मारहाणीनंतर मस्साजोग येथील सरपंच पती संतोष देशमुख यांच्या गाडीला डोणगाव फाटा येथील टोलनाक्याजवळ अडवुन अपहरण करून त्यांचा खुन करण्यात आला.या घटनेनंतर मस्साजोग येथील गावकरी व समाज बांधव यांनी केज पोलिसांनी सदर प्रकरणा तील आरोपींना तात्काळ अटक करावी अन्यथा आम्ही मृतदेह ताब्यात घेणार नाही असा पवित्रा घेत दिवसभर अंबाजोगाई -बीड रोडवर दिवसभर ठिय्या आंदोलन केले.या आंदोलनाला हिंसक वळण लागले असुन बस पेटवण्यात आली तसेच खाजगी वहानावर दगड फेक करण्यात आली. अंबाजोगाई - बीड रस्त्या वर आंदोलकांनी दिवस भर ठिय्या दिला. सायंकाळी मनोज जरांगे पाटील यांनी मस्साजोग येथील ग्रामस्थांची भेट घेऊन घटनेची माहीती घेऊन जिल्हा पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्याशी चर्चा केली.आरोपीला तात्काळ अटक करुन त्यांना फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी केली तसेच पोलिस उप निरीक्षक राजेश पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाई करत पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांची चौकशी करण्यात येणार असल्याचे पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी आंदोलकांशी बोलताना सांगितले आहे.





### मस्साजोगच्या तरुण सरपंचाचा खून म्हणजे बीडचा बिहार. - खा.बजरंग सोनवणे

सरपंच यांना गाडीत टाकून नेले आणि खून केला घटना दुर्दैवी व प्रचंड वेदना देणारी आहे. पवनचक्कीच्या खंडणी प्रकरणात झालेला खून व त्या मागे कुणाचा हात आहे हे शोधले पाहिजे. बीडचे पोलीस अधीक्षक जर फोन उचलणार नसतील तर गंभीर आहे. आपण सदरील प्रश्न लोकसभेत उपस्थित करणार असून झालेला खून हा बीड पोलीस यंत्रनेवर प्रश्न उपस्थित करणारा आहे.एक व्हिडीओ जाहीर करून खा.बजरंग सोनवणे यांनी कायदा व सुव्यवस्था वर नाराजी व्यक्त केली आहे.

### ■ मस्साजोग येथील आंदोलन तात्पुरते स्थगित ■

केज/प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आला होता. त्याच्या निषेधार्थ खालील मागण्यांसाठी कालपासून गावात शांततेतरास्तारोको सुरु होता.

मस्साजोग ग्रामस्थांच्या मागण्या१.संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करणाऱ्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी २.आरोपींना राजकीय वरदहस्त देणाऱ्यांना सहआरोपी करावे३.केजचे पोलीस निरीक्षक आणि उप निरीक्षक यांचे निलंबन करून त्यांना सहआरोपी करावे ४.हे प्रकरण सीआयडीकडे हस्तांतरित करून फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे ५.घटनास्थळाचे आय विटनेस शिवराज देशमुख यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे सर्व आरोपींना ३ दिवसांत अटक केली जाईल पोलीस उपनिरीक्षकांचे निलंबन करण्यात आले असून, निरीक्षकांच्या निलंबनाची प्रक्रिया दोन दिवसात पूर्ण केली जाईल प्रकरण सीआयडीकडे वर्ग केले जाईल सरकारी वकील नेमले जातील प्रशासनाने सर्व मागण्यांसंदर्भातआश्वासन दिल्यानंतर प्रेताची विटंबना टाळण्यासाठी व अंत्यविधी करण्यासाठी आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.पुढील ३ दिवसांत जर मागण्या पूर्ण झाल्या नाहीत आणि दगा झाला तर संपूर्ण बीड जिल्ह्यात तिव्र आंदोलन छेडले जाईल असा ईशारा आंदोलकांनी दिला आहे.

### मस्साजोगचे खून प्रकरण व परळीच्या अपहरणाचा तपास विशेष तपास यंत्रणेमार्फत व्हावा - आ. पंकजाताई मुंडे

बीड । मस्साजोग येथील सरपंचाचा खून आणि परळीतील तरूण व्यापाऱ्याचे झालेले



अपहरण हा प्रकार अतिशय गंभीर असून या दोन्ही घटनांचा तपास विशेष तपास यंत्रणेद्वारे व्हावा अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांनी केली आहे. जिल्हयात घडणाऱ्या अशा घटनां विषयी आ. पंकजाताईंनी चिंता व्यक्त केली असून याविषयी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी आपण स्वतः चर्चा करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

(उर्वरीत पान २ वर)

### आरोपीना कठोर शासन करावे - आ. नमिता मुंदडा

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच पती संतोष पंडितराव देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तातडीने अटक करावे आणि या प्रकरणाची पाळेमुळे शोधून आरोपींना कठोर शासन करावे अशी मागणी केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.मस्साजोग येथील माजी सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांचे दि.९ डिसेंबर रोजी दुपारी अपहरण करून नंतर निर्घुण खूनकरण्यात आला.या प्रकरणातील आरोपी अद्याप मोकाट आहेत.त्यामुळे नागरिकां मधून तीव्र संताप व्यक्त



(उर्वरीत पान २ वर)

### मास्टरमाइंड चा तातडीने शोध घ्यावा आ. सुरेश धस यांची मागणी

आष्टी (प्रतिनिधी)

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे भरदुपारी राजरोसपणे राज्य रस्त्यावर अपहरण करून त्यांचा खून करण्यात आला आहे अत्यंत गंभीर असून या घटनेचा सखोल तपास करून या घटनेतील मास्टर माईंड कोण आहे? याचा छडा पोलिसांनी लावला पाहिजे असे मत आ. सुरेश धस यांनी व्यक्त करत केजची घटना अंत्यंत दुर्दैवी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. माध्यमांशी बोलताना आ. धस म्हणाले की, केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच असलेल्या संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आल्याची घटना सोमवारी घडली. एखाद्या गावच्या प्रथम नागरिक असलेल्या व्यक्तीचे अपहरण होते त्यानंतर त्याची हत्या करण्यात येते ही अत्यंत निंदनीय बाब असून या घटनेतील जे कोणी मुख्य आरोपी असतील त्यांना तात्काळ अटक झाली पाहिजे. शिवाय या घटनेच्या मागे नेमके मास्टर माईंड कोण आहेत? कारण भर दिवसा हत्या करण्याचे धाडस या आरोपींनी केले आहे त्यामध्ये निश्चितपणे कोणीतरी बडीशक्ती असावी



### मस्साजोग प्रकरणात शासन-प्रशासनाने न्याय द्यावा- आ.संदीप क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

पवनचक्की धारकांकडून बीड जिल्ह्यात अनेक बेकायदेशीर गैरप्रकार होत आहेत. पवनचक्की संदर्भाने शेतकरी व नागरिक यांना धमकावणे, गुंडगिरी, फसवणूक झाल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. यातच पवनचक्कीच्याच संदर्भातील प्रकरणातून केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच असलेले स्व.संतोष देशमुख यांची निघृण हत्या झाली आहे. या प्रकरणात शासन आणि प्रशासनाने स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना संरक्षण आरोपींना तात्काळ अटक करून कायदेशीर कडक कारवाई करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.



बीड विधानसभा क्षेत्रासह संपूर्ण बीड जिल्ह्यात गेल्या

(उर्वरीत पान २ वर)



## अंबाजोगाईत विराट हिंदू शक्तीचे प्रदर्शन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बांगलादेशातील हिंदूवर होणारे अनन्वित अत्याचार थांबवावेत या मागणीसाठी आज अंबाजोगाईतील विराट हिंदू शक्ती एकजुटीने रस्त्यावर उतरली होती.मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून अंबाजोगाईतील विविध हिंदू संघटना बांगलादेशातील हिंदूंवर होणारे अनन्वित अत्याचार थांबवावेत या मागणीसाठी एकजुटीने रस्त्यावर उतरले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व हिंदू समाज बांधवांनी बांगलादेशात होणाऱ्या हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात व हिंदू मंदिरे पाडण्याच्या निषेधार्थ छत्रपती शिवाजी महाराज चौकात तीव्र निदर्शने करण्यात आली. अंबाजोगाईतील हिंदू समाजाच्या वतीने राष्ट्रपतींची नावे येथील उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले या निवेदनानुसार बांगलादेशातील हिंदू व इतर सर्व अल्पसंख्यांक समाजावर कट्टरता वाद्यांकडून होणारे हल्ले लुटमार जाळपोळ महिलां

### बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार थांबवण्याची मागणी

वरील हल्ले रोखण्यात यावे व हे अत्याचार तात्काळ थांबवले पाहिजेत अशी एकमुखी मागणी दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. अंबाजोगाई येथील सर्व हिंदुत्ववादी संघटनांनी एकत्र येऊन बांगलादेशच्या विरुद्ध निषेधाच्या घोषणा दिल्या.

वंदे मातरम, जय श्रीराम, भारत माता की जय, बांगलादेश मुर्दाबाद, आदी प्रचंड घोषणा देत हा जन आक्रोश मोर्चा शहराच्या प्रमुख मार्गावरून निघाला होता सर्वत्र भगवे ध्वज,निषेधाचे फलक घेऊन तरुणाई व मातृ शक्ती ची संख्या लक्षणीय होती.

### २ कोटीच्या खंडणीकरिता अपहरण; अर्ध्या रस्त्यात दिले सोडून

परळी / प्रतिनिधी

परळी शहरातील प्रतिष्ठित युवा उद्योजक- व्यापाऱ्याचे पिस्तूलाचा धाक दाखवून अपहरण करण्यात आल्याच्या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आहे.लाखोंचा ऐवज घेतल्यावर परळी-अंबाजोगाई मार्गावर भर रस्त्यात व्यापाऱ्यांला सोडून देण्यात आले.ही घटना सोमवार दि ९ रोजी परळी शहरात घडली.



परळी शहरातील भाजपाचे ज्येष्ठ नेते विकासराव डुबे यांचे चिरंजीव अमोल डुबे यांचे औद्योगिक वसाहत येथे उद्योग व व्यापारी पेढी आहे. नेहमीप्रमाणे ते सोमवार दि

(उर्वरीत पान २ वर)

### १२ डिसेंबरला गोपीनाथ गडावर उसळणार अलोट गर्दी

परळी : लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी येत्या १२ डिसेंबर रोजी गोपीनाथ गडावर राज्याच्या कानाकोपर्यातून मोठी गर्दी उसळणार आहे. भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यावेळी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान आपापल्या गावात, वॉर्डात जयंती साजरी करा तसेच मुंडे साहेबांचे संस्कार जिवंत ठेवण्यासाठी सदैव कार्यरत राहण्याचे वचन द्या असं आवाहन आ. पंकजाताईंनी केलं आहे.

(उर्वरीत पान २ वर)

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग गुन्हा दाखल

परळी / प्रतिनिधी

संभाजीनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत अझादनगर ते मिलिंदनगर रस्त्यावरील एका किराणा दुकानाच्या जवळून जात असलेल्या दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याची घटना घडली. याप्रकरणी आरोपी विरुध्द विनयभंगासह अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, परळी संभाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या मिलिंद नगर भागात आज सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास फिर्यादी अल्पवयीन मुलगी व दुसरी एक मुलगी

(उर्वरीत पान २ वर)

### ■ मित्राची पार्टी भोवली! ■

## ट्रकला स्विफ्ट कारची जोराची धडक, चौघांचा मृत्यू, दोघे जखमी



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबासाखर कारखान्या जवळ समोरून येणाऱ्या ट्रकला स्विफ्ट कारची जोराची धडक,लातूर जिल्ह्याच्या कारेपूर गावातील चौघांचा मृत्यू, दोघे जखमी. मित्राची पोलीस मध्ये निवड झाल्यामुळे जेवणाच्या पार्टीसाठी स्विफ्ट कार ने गेलेले मित्र परत येत असताना त्यांच्या स्विफ्ट कार व ट्रकचा समोरासमोर भिषण अपघात होऊन कार मधील तिघेजण जागीच ठार तर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली असून दोघेजण जखमी आहेत. जखमी दोघांवर अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात आज सकाळी ७.००

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# वाळवंटातले वालीहीन!

असद ही ब्याद होती, सीरियाच्या भल्यासाठी त्यांना हाकलणे आवश्यकच होते; पण पुढे काय, याचे उत्तर ना सीरियनांकडे आहे ना पाश्चात्त्यांस त्यात स्वारस्य आहे.या पृथ्वीतलावर सीरियासारखा दुर्दैवी देश नसेल आणि सीरियन्ससारखे दुसरे अभागी नागरिक नसतील. या देशाचा प्रमुख स्वत:च्याच नागरिकांविरोधात रासायनिक अस्त्रे वापरतो, स्वत: अय्याशीत जगत असताना नागरिकांच्या अक्षरश: उद्ध्वस्त आयुष्याकडे काणाडोळा करतो आणि ज्याला आपल्या प्रजेविषयी कसलीही सहानुभूती नसते असा या देशाचा पदच्युत अध्यक्ष बशर अल असद याचा लौकिक. बंडखोरांच्या रेट्यामुळे या असदवर परागंदा होण्याची वेळ आली. सीरियन्ससाठी हा मुक्तीचा क्षण होता आणि एखाद्या निवडणुकीनंतर आपल्याकडे फटाके वाजावेत तशा हवेत बंदुकांच्या फैरी झाडत नागरिकांनी स्वातंत्र्य साजरे केले. या बशर यास देशाचे प्रमुखपद वारशातून मिळाले. याचे तीर्थरूप हफीज अल असद हे जवळपास ३० वर्षे सीरियाचे अध्यक्ष होते. ती त्यांची कमाई होती. गरीब घरातून आलेले हफीज राजकीय चळवळीकडे आकृष्ट झाले आणि बाथ पक्षातून चढत ते अध्यक्षपदापर्यंत पोहोचले. ते २००० साली गेले. त्यानंतर ते पद बशर यांस मिळाले. वास्तविक त्या वेळी ते पद त्यांच्या ज्येष्ठ बंधूकडे जाते. पण त्यांचेही अपघाती निधन झाल्यामुळे बशर यांस संधी मिळाली. वास्तविक त्या वेळी हे बशर अध्यक्षपदासाठी पात्र नव्हते. कारण वय. सीरियन घटनेप्रमाणे या पदासाठी किमान वय ४० हवे. पण बशर हे तेव्हा ३४ वर्षांचे होते. त्यामुळे या बशरभाईंसाठी घटनेत बदल केला गेला आणि अध्यक्षपदी त्यांची 'नियुक्ती' झाली. म्हणजे सुमारे पाच दशके या देशावर असद घराण्याचा अंमल आहे. तो आता संपला. अर्धशतकाहून अधिक काळच्या असद राजवटीत लक्षावधींचे प्राण घेणाऱ्या, तितक्याच जणांस तुरुंगात डांबणाऱ्या बशर यांच्या विरोधात उठाव झाला आणि त्यांना पत्नीसह दमास्कसमधून पळून जावे लागले. बांगलादेश, श्रीलंका आदी देशांत जे झाले त्याचीच ही अरब पुनरावृत्ती.

ती ज्याच्यामुळे झाली ते बशर अल असद हे नेते म्हणून इतके नतद्रष्ट आहेत की मानवी संस्कृती विकासाच्या केंद्रस्थानी असलेल्या अत्यंत ऐतिहासिक अशा वारशाचे आपण रक्षणकर्ते आहोत ही जाणीव त्यांस कधीही नव्हती. वास्तविक ते पाश्चात्त्य विद्याविभूषित. नेत्रशल्यचिकित्सक. त्यामुळे ते आपल्या वडिलांप्रमाणे असणार नाहीत, सुधारणावादी असतील अशी अपेक्षा होती. ती पहिल्याच वर्षी धुळीस मिळाली. राजकीय विरोधकांचे २००१ सालचे आंदोलन त्यांनी थोरल्या असदांच्या शैलीत चिरडले. त्या वेळी इतका रक्तपात झाला की दमास्कसमध्ये रक्ताचे शब्दश: पाट वाहिले आणि त्यातील रक्तधारा आठवडाभर 'ओल्या' होत्या. खरे तर दमास्कस हे इसवी सनाच्याही आधीपासूनचे एक महानगर. तुर्की-चलित ऑटोमन साम्राज्याच्या काळातही दमास्कसची भूमिका महत्त्वाची होती आणि नंतर ब्रिटिशांच्या हाती हा सारा परिसर गेल्यानंतरही हे शहर त्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिले. 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' म्हणून ओळखले जातात ते टी. ई. लॉरेन्स यांचाही संबंध या शहराच्या जडणघडणीत होता. इराक, जॉर्डन, इस्रायल आदींस प्रागऐतिहासिक वारसा आहे. त्यांच्याइतकाच सीरियाही समृद्ध. यहुदी, अरब, कुर्द, अलवाईट्स, ख्रिश्चनांतील विविध अल्पसंख्य समुदाय इत्यादी अठरापगड नाही तरी डझनभर विविध धार्मिक/ वांशिक नागरिक या देशात राहतात. खुद्द असद हे अलवाईट्स पंथाचे. ही इस्लामच्या शिया शाखेतील एक फांदी. सुन्नींच्या तुलनेत शिया तसेही कट्टर नसतात. त्यात अलवाईट्स अधिकच सहिष्णू. त्यामुळेही असेल सीरिया हा अन्य अरब शेजाऱ्यांच्या तुलनेत नेहमीच प्रगतशील राहिला. हे एका अर्थी इराकच्या सद्दाम हुसेन याच्या राजवटीसारखे म्हणायचे. जगासाठी क्रूरकर्मा इत्यादी असलेला सद्दाम हा प्रागतिक होता आणि त्याच्या राजवटीत महिलांस बुरखा/ हिजाब आदींची सक्ती नव्हती. महिलांस त्या काळी शिक्षण सहज घेता येत असे. असद यांची राजवटही अशीच होती. सहिष्णू आणि धर्मनिरपेक्ष.

# विज्ञान प्रदर्शनामधून संशोधक निर्माण झाले पाहिजेत - देविदास आबा धस

**आष्टी (प्रतिनिधी)**

**तालुक्यात दिनांक ६ व ७ डिसेंबर २०२४ रोजी जामगाव येथील निवृत्तीराव धस विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले. या प्रदर्शनाचा ७ डिसेंबर २०२४ रोजी मोठ्या उत्साहात समारोप झाला. या विज्ञान प्रदर्शनात जवळपास १०० शाळांनी सहभाग घेत विविध विषयावर प्रयोग सादर करत साहित्याची मांडणी केली होती. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रसंगी विज्ञान प्रदर्शनामधून संशोधक निर्माण झाले पाहिजेत असे प्रतिपादन विज्ञान प्रदर्शन उद्घाटनाचे अध्यक्ष माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस यांनी केले.**

यावेळी त्यांनी निरीक्षकाने पक्षपातीपणा करु नये व योग्य प्रयोगाची निवड करण्यात यावी. गावातील विद्यार्थी गावातच शिकला पाहिजे. पालकांनी विद्यार्थी गावातील शाळेतच घातला पाहिजे. विज्ञान प्रदर्शनामधून शेती संशोधन व वृक्ष लागवडीला प्राधान्य देऊन वृक्षारोपणाचे महत्त्व विद्यार्थी व ग्रामस्थ यांना सांगितले पाहिजे व त्याची अंमलबजावणी केली पाहिजे तरच सृष्टी टिकेल असे सांगत माझ्या कार्यकाळामध्ये मी पंचायत समिती आष्टी, कोर्ट परिसर रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली व त्याचे संवर्धन केले असे सांगून झाडे लावण्याचे आव्हान उपस्थितांना केले.

या प्रदर्शनात प्राथमिक विभागातून कें. प्रा. शा. धामणगाव तर माध्यमिक विभागातून पारगाव जोगेश्वरी या शाळेने प्रथम क्रमांक पटकावला तर प्राथमिक मधून द्वितीय कें. प्रा. शा. कडा नंबर एक तर माध्यमिक मधून मोतीलाल विद्यालय कडा तर तृतीय क्रमांक वि. दा. सावरकर चिखली व माध्यमिक मधून जि. प. मा. शा. हरिनारायण आष्टा या शाळेने द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावले. धामणगाव जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथील सहावी - सातवीच्या विद्यार्थ्यांनी तसेच मार्गदर्शक तंत्रस्नेही शिक्षक प्रमोद धुर्वे सर यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली विज्ञान उपकरणाचा तालुकास्तरीय प्रदर्शनामध्ये प्रथम



क्रमांक आला. या प्रयोगाद्वारे प्रमोद धूर्वे सरांच्या मार्गदर्शनाखाली प्रिया राजेंद्र शिंदे, अपूर्वा इंदीवर मधुर, श्रेया हनुमंत चौधरी, समृद्धी लोखंडे, प्रवीण लोखंडे, पियुष ढेपे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्रयोगाचे सादरीकरण केले. सदर प्रयोगासाठी बोर्ड, बॅटरी, कॉपर, वायर, प्लास्टिक पाईप, बॅटरी कनेक्टर स्विच, रजिस्टर ट्रांजिस्टर आदी साहित्य गोळा करून वायरलेस इलेक्ट्रिसिटी साहित्य तयार करून वायरलेस इलेक्ट्रिसिटी या प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले होते. तालुकास्तरीय परीक्षा समितीने परीक्षण करून या शाळेचा प्रथम क्रमांक जाहीर केला. यावेळी व्यासपीठावर बि. डी. हंबर्डे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपान निंबोरे, गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव, विस्तारअधिकारी अर्जुन गुंड, केंद्रप्रमुख सुनिता उगले, प्राचार्य सूर्यकांत मोकाशे, मुख्याध्यापक विष्णू आदनाक आदी मान्यवर उपस्थित होते.जामगाव येथे आयोजित केलेल्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनांमध्ये तालुक्यातील शंभर शाळांनी सहभाग नोंदवत नवनवीन विविध विषयावर प्रयोग सादर केले व सहभाग घेतला. विज्ञान प्रदर्शनात सहभागी होऊन वेगळे काही करण्याचा विचार विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होतो व अशा प्रयोगांमधून भविष्यात करियर घडवण्यासाठी संशोधक होण्याचा विद्यार्थी प्रयत्न करतात व त्यासाठी विज्ञान प्रदर्शन हे एक मोठे माध्यम आहे यातून सर्वांना ऊर्जा मिळेल असे मत आष्टी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव यांनी व्यक्त केले.



बीड/प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे याचे विधान सभा निवडणुकीतील विजयाबद्दल अभिनंदन करून महाराष्ट्र राज्य पत्रकारसंघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी दीक्षा भूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेची माहिती पुस्तिका भेट दिली. पत्रकारांच्या मागण्या बाबत सविस्तर चर्चा करून आगामी काळात सरकारच्या माध्यमातून मागण्या पूर्ण करण्या साठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी दिली. यावेळी पत्रकार संघाचे मंत्रालय संपर्कप्रमुख नितीन जाधव यावेळी उपस्थित होते.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा गेवराई, जि. बीड येथील**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९२५/२०२४**
**परमेश्वर विरूध्द निरंक**
**(मार्फत आय.बी. नागरे गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे कं. १ गाऊबाई भ्र. भगवान काळे हया दिनांक १५/०३/२०१६ रोजी मौजे धोंडराई, ता. गेवराई, जि.बीड व मयत नामे कं. २. भगवान पि. गेणु काळे हे दिनांक १०/०८/२००४ रोजी मौजे धोंडराई, ता. गेवराई, जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार परमेश्वर पि. भगवान काळे वय ५२ वर्षे, धंदा शेती रा. धोंडराई, ता. गेवराई, जि.बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत मयत नाम क्रं. १. गाऊबाई भ्र. भगवान काळे व मयत नामे क्रं. २. भगवान पि. गेणु काळे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/१२/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०९/०१/२०२५

| कनिष्ठ लिपीक<br>दिवाणी न्यायालय<br>क. स्तर,गेवराई | शिक्का | आदेशावरुन,<br>सहायक अधिक्षक<br>दिवाणी न्यायालय<br>क. स्तर,गेवराई |
|---|---|---|

**दै.समर्थ राजयोग, दि.११ डिसेंबर २०२४**

**CHANGE IN NAME**

I have change my name from,
WARNGULE BALAJI BHASKAR TO,
BALAJI BHASKAR WARANGULE,
Hence for this declaration in future
OLD NAME: WARNGULE BALAJI BHASKAR
NEW NAME: BALAJI BHASKAR WARANGULE
ADRESS:- A/P MURSHADPUR, ASHTI, TQ-ASHTI
DIST-BEED,414203
ADHAR NO: 277603633781
MO.NO. :- 8657760778

पान १ वरून...

**मस्साजोगचे खून प्रकरण व परळीच्या ...**

मस्साजोग ता. केज येथील माजी सरपंच संतोष देशमुख यांचा खून झाल्याची घटना नुकतीच घडली. त्याचप्रमाणे परळी येथील तरूण व्यापारी अमोल डुबे यांचं काल रात्री काही लोकांनी अपहरण करून लूटमार केली याबाबत माहिती प्राप्त झाली . या दोन्ही घटनांबरोबरच जिल्हयात अलिकडच्या काळात घडलेल्या घटना चिंताजनक आहेत पोलिसांनी या दोन्ही घटनांची स्पेशल इन्व्हिस्टीगेशन टीमद्वारे सखोल चौकशी करावी अशी मागणी करून आ. पंकजाताई मुंडे यांनी जिल्हयात अशा घटना घडत आहेत याबद्दल संताप व्यक्त केला आहे . याबाबत मी स्वतः मुख्यमंत्र्यांशी भेटून चर्चा करणार आहे असं त्यांनी म्हटलं आहे.

**१२ डिसेंबरला गोपीनाथ ...**

यासंदर्भात आ. पंकजाताई मुंडे यांनी सोशल मीडियातून राज्यभरातील कार्यकर्त्यांना महत्वाचा संदेश दिला आहे, त्या म्हणाल्या, विधानसभा निवडणुकीत मराठवाड्यात महायुतीला अभूतपूर्व असं यश मिळालं आहे. या यशाबद्दल १२ डिसेंबरला मुंडे साहेबांच्या जयंतीनिमित्त महायुतीच्या सर्व आमदारांचा सत्कार तसेच मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री यांना गोपीनाथ गडावर निमंत्रित करण्याची माझी इच्छा होती. परंतू शपथविधीच्या अनिश्चित तारखांमुळे हे होऊ शकत नाही. असा कार्यक्रम जंगी मी नंतर भविष्यात घेईलच. परंतू सध्या मुंडे साहेबांची जयंती अत्यंत साध्या पध्दतीने साजरी करण्याचा निर्णय मी घेतला असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

पुढे बोलतांना आ. पंकजाताई म्हणाल्या, १२ डिसेंबरला मी सकाळी ११ वा. गोपीनाथ गडावर येईल. सकाळी ११ ते दुपारी २ वा. दरम्यान गडावर नेहमीप्रमाणे कार्यक्रम होतील. ज्यांना यादिवशी यायला जमणार नाही, त्यांनी परंपरेप्रमाणे आपापल्या गावांमध्ये, वॉर्डामध्ये मुंडे साहेबांची जयंती साजरी करावी व त्यांना अभिवादन करावे आणि मुंडे साहेबांचे संस्कार जिवंत ठेवण्यासाठी सदैव कार्यरत राहण्याचं वचन द्यावे असे आवाहन केले आहे.

**महाविद्यालयीन तरुणीची ..**

गळफास लावून आत्महत्या केली.या प्रकरणी आत्महत्येस प्रवृत्त केल्यावरून ४ जणांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु दामिनी पथक यांनी कारवाई केली असती तर सदरील घटना घडली नसती असे काही तज्ञ कडून बोलल्या जात आहे. दामिनी पथक कुठे आहे तिचे चर्चा जिल्हाभरात सुरू आहे याप्रकरणी पोलीस अधीक्षक यांनीही तत्काळ लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच या प्रकरणी आज अंबड शहर बंद ठेवण्यात येणार आहे अशी माहिती व्यापारी महासंघाचे अध्यक्ष द्वारकादास जाधव यांनी माहिती दिली आहे. तसेच ते म्हणाले की निवेदन देण्याकरता दुपारपर्यंत अंबड बंद ठेवण्यात येणार आहे अशी माहिती व्यापारी महासंघाचे अध्यक्ष द्वारकादास जाधव यांनी दिली आहे.

या घटने बाबत अधिक माहिती अशी की,शारदा नगर समोर मुंदडा कॉम्लेक्सच्या राहत असलेल्या भाग्यश्री सुरेश घाडगे हिला सोहम मिंधर व दुर्गेश एकनाथ चित्रे यांनी मागील अनेक वर्षांपासुन तिचे फोटो व व्हिडीओ काढुन सोशल मिडीयावर व्हायरल करेल अशी धमकी देवुन त्रास देत होते. त्यामुळे भाग्यश्री हिने सोहम विरोधात अंबड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला. आत्महत्या करण्या अगोदर एकाच आरोपी विरुद्ध तक्रार होती अशी माहिती पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ ढाकणे यांच्याकडून कळविण्यात आले आहे.दरम्यान नमुद गुन्हा मागे घ्यावा म्हणुन यातील सोहमचे वडिल बळीराम मिंधर व बळीराम मिंधर यांची पत्नी यांनी फिर्यादी व मयत मुलगी भाग्यश्री हिस घरी येवुन धमकावले.

सोहम मिंधर,बळीराम मिंधर, बळीराम मिंधर याची पत्नी सर्व राहणार बाचेगाव तालुका घनसावंगी. हल्ली मुक्काम अंबड, व दुर्गेश चित्रे व (सर्व रा.अंबड) यांच्या त्रासाला कंटाळुन भाग्यश्री सुरेश घाडगे ही आत्महत्येस प्रवृत्त झाली.

या प्रकरणी मयत मुलीचे वडिल सुरेश बालाजी घाडगे यांच्या फिर्यादीवरून अंबड पोलीस ठाण्यात वरील ४ जणांविरुद्ध कलम १०८,३ (५) भा.न्या.संहीता २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या घटनेचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक गुरले हे करत आहेत.

पान १ वरून...

**मस्साजोग प्रकरणात शासन-..**

दोन वर्षांपासून पवनचक्की कंपन्या कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. दरम्यान या पवनचक्की कंपन्यांच्या मालक व हस्तकांकडून ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना धमकावणे, फसवणे, मारहाण करणे, जमिनी बळकावणे, पवनचक्की चे काम करताना शेतातील पिकांचे नुकसान करणे असे अनेक प्रकार मागील काळात घडले आहेत. यासोबतच पवनचक्कीच्या कामात शेतकऱ्यांची जमिनीचे हस्तांतरण झाल्यानंतर शेतकऱ्यांना ठरलेल्या रकमेप्रमाणे देयके न देणे असेही गैरप्रकार पवनचक्की कंपन्यांकडून व त्यांच्या हस्तकांकडून घडलेले आहेत. आता तर या लोकांची थेट हत्या करण्यापर्यंत मजल गेली आहे. केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची निघृण हत्या झाल्याचा प्रकार सोमवार (दि.९) रोजी बीड जिल्ह्यात घडला आहे. हा प्रकार म्हणजे कायदा आणि सुव्यवस्थेचे अक्षरश: वाभाडे काढल्यासारखा आहे. त्यामुळे या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून कडक कायदेशीर कारवाई करावी. यासोबतच बीड मतदारसंघ क्षेत्रातील चौसाळा, नेकनूर, लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील बहुतांश गावात देखील पवनचक्की मालक व त्यांच्या हस्तकांकडून वारंवार असे प्रकार घडले आहेत. त्यातून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. पवनचक्की संदर्भाने बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था संदर्भाने मोठा प्रश्न निर्माण होत आहे. याबाबत शासन आणि प्रशासनाने योग्य पाऊले घेऊन कारवाई करावी. यासोबतच गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी निष्पक्ष पवित्रा घ्यावा अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. यासंदर्भात आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, विभागीय आयुक्त, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण चे महासंचालक, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

**आरोपीना कठोर शासन ...**

करण्यात येत असून नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.आरोपींच्या अटके साठी ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलने करण्यात येत आहेत.संतोष पंडित राव देशमुख हे मस्साजोग गावचे सरपंच पती होते. सदर घडलेला प्रकार अतिशय गंभीर आहे. त्यामुळे सदर खून प्रकरणाचा तपास जलद गतीने करून प्रकरणाच्या मुळाशी जावून सर्व संबंधित आरोपींना अटक करून कठोर शासनकरणे अत्यंत गरजेचे आहे असे आ.नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्रफडणवीस आणि बीड जिल्हापोलीस अधीक्षक यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे.दरम्यान आ. मुंदडा यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या सोबत चर्चा केली असून तातडीने आरोपींचा शोध घ्यावा अशा सूचना केल्या आहेत.केज सारख्या अतिशय सहिष्णू आणि शांत मतदार संघात अशी अमानुष घटना निंदनीय असून या प्रकरणाच्या बारकाईने तपासाबाबत स्वतः पाठपुरावा करणार असल्याचेही आ.मुंदडा यांनी सांगितले.

संवेदनशील व्यक्तिमत्व गमावले

मस्साजोग ग्रामस्थांच्या अडीअडचणी सोडविण्या साठी संतोष देशमुख हे सतत पुढाकार घेत. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी प्रयत्नपूर्वक गावाच्या विकासात योगदान दिले.अतिशय शांत,सुस्वभावीव्यक्तिमत्व अशी त्यांची पंचक्रोशीत ओळख होती.त्यांच्या अकाली निधनाने एक संवेदनशील व्यक्तिमत्व गमावले आहे अशा शब्दात आ.नमिता मुंदडा यांनी संतोष देशमुख यांना श्रद्धांजली वाहिली आहे.तसेच राज्य सभेच्या खासदार रजनीताई पाटील,मा.आ.पृथ्वीराज साठे,आ.सुरेश धस यांनी ही सदरील घटनेचा निषेध केला असुन आरोपीला कठोर शासन करावे अशी मागणी त्यांनी लिहीलेल्या पत्रात केली आहे.

**अल्पवयीन मुलीचा...**

अशा दोघीजणी एका किराणा दुकानाच्या जवळून जात असताना आरोपी फिरदौस इसाद मोहमंद शेख (रा. फुकटपुरा परळी)

हा उभा होता. दोन मुली तेथून जात असताना त्याने दोघींकडे पाहून डोळा मारला. जाने मन असे म्हणून मुलीच्या खांद्यावर हात टाकून घरामध्ये चल असे म्हणू

पान १ वरून...

लागला. तेव्हा तक्रारदार मुलीने विरोध केल्यानंतरही आरोपीने बळजबरीने अंगावर वाईट हेतूने लज्जा वाटेल असा हात टाकला व घरी कोणाला सांगितले तर तुला मारून टाकीन अशी धमकी दिली. मुलगी मागासवर्गीय असल्याचे माहीत असूनही त्याने जातीवाचक शिवीगाळ केली. या गंभीर प्रकरणी पीडित मुलीने भाऊ, मावशी यांना सांगित्यानंतर या मुलीला संभाजीनगर पोलीस ठाण्यात आणून पोलिसांना सर्व हकीकत सांगितल्यानंतर पोलिसांनी या आरोपी विरूध्द कलम ७५ (१) (ळ), ७५ (ळीं), ७८(१) (ळ), ३५१ (२), ३५५ (३) प्रमाणे गुन्हा दाखल केलक आहे. या प्रकरणाचा पुढील तपास संभाजीनगर पोलीस करीत आहेत.

**ट्रकला स्विफ्ट कारची...**

वाजताच्या दरम्यान झाला आहे. अपघातातील सर्वजण हे कारेपूर ता. रेणापूर, जिल्हा लातूर येथील रहिवासी आहेत. घटनेनंतर कारेपूर गावावर शोककळा पसरली आहे.

मित्राची पुणे येथे पोलीस मध्ये निवड झाल्यामुळे आनंदासाठी स्नेही भोजनाचे आयोजन केले होते. लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यातील कारेपूर या गावचे मित्र दि. ९ डिसेंबर सोमवारी रात्री जेवणासाठी मांजरसुंबा (जिल्हा बीड) जवळ गेले होते. तेथे जेवण करून पहाटे मांजरसुंबा येथील ब्रिज खाली शेकोटी करून चार वाजता स्विफ्ट कार क्रमांक एम एच १४, एल एल ६७४९ मांजरसुंबा येथून निघून पुढे अंबासाखर कारखाना मार्गे रेणापूरकडे महामार्गाने जात असताना अंबासाखर कारखाना जवळ समोरून येणाऱ्या ट्रकला समोरासमोर शिफ्ट कारची धडक झाल्यामुळे कारचा चुराडा होत शिफ्ट कार मधील तिघांचा जागेवरच मृत्यू झाला झाला. यात मयत १) बालाजी शंकर माने (वय २७), २)फारुख बाबुमिंया शेख (वय ३०), ३)दिपक दिलीप सावरे( वय २८) , ४) ऋतवीक गायकवाड (रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू) यातील जख्मी १) मुबारक शेख, २) अजिम पाशुभाई शेख (३० वय) (पोलीस निवड) स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

दरम्यान अपघाताची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रामा पडवळ पोलीस कर्मचारी नाना राऊत व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी धाव घेत जखमींना पुढील उपचारासाठी तात्काळ रुग्णालयात हलवले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान हा महामार्गवर आजपर्यंत अनेक अपघात झाले असून या महामार्ग चौपदरी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

**२ कोटीच्या खंडणीकरिता...**

९ रोजी आपल्या ऑफिसमधून बाहेर मोटरसायकलवर बसत असताना अज्ञात पाच ते सहा लोकांनी येऊन त्यांना बळजबरी उचलून गाडीत टाकले व अंबाजोगाईच्या दिशेने घेऊन गेले. दरम्यान त्यांच्याकडे मोठ्या रकमेची मागणी करत ती रक्कम सुपूर्द करा, मग तुम्हाला सोडून देतो असे त्यांना सांगण्यात आले. घाबरून जाऊन अमोल डुबे यांनी गळ्यातील सोनन्याची चैन, जवळील रक्कम व आपल्या ड्रायव्हरला फोन लावून काही रक्कम आणून अपहरणकर्त्यांना दिली. त्यानंतर अंबाजोगाई रस्त्यावरील रामरक्षा गोशाळेच्या पुढे गेल्यानंतर या अपहरणकर्त्यांनी त्यांना सोडून देऊन अपहरणकर्ते फरार झाले.

चार ते पाच तोंडाला काळ्या पट्ट्या बांधलेले लोक असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यांच्या अपहरणाची घटना त्यांच्या ऑफिसच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यातही कैद झाली आहे. परंतु या घटनेने व्यापारी व परळी शहरात मोठी दहशत निर्माण झाली आहे. याप्रकरणी आता परळी शहर पोलीस ठाण्यात

मोठ्या संख्येने व्यापारी, नागरिक जमा झाले असुन या अपहरण प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. दरम्यान अमोल डुबे हे पंकजाताई मुंडे यांचे निकटवर्तीय भाजप ज्येष्ठ नेते विकासराव डुबे यांचे चिरंजीव असून एवढ्या प्रतिष्ठित उद्योजक व्यापारी परिवारातील मुलाचे अपहरण झाल्याची घटना घडल्याने नागरिकात दहशत निर्माण झाली आहे. या प्रकरणाची अधिकृत अधिक माहिती व सविस्तर प्रकरण काय आहे हे पोलिसात गुन्हा दाखल झाल्यानंतरच लक्षात येणार आहे.

सन २०२३ सालातील राहिलेला ७५% विमा आणि २०२४ सालातील

# खरीपाचा विमा व अनुदान शेतकऱ्यांना तात्काळ द्या :– भाई विष्णुपंत घोलप

पाटोदा (प्रतिनिधी)

सन २०२३ मध्ये पावसाच्या खंडामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली होती त्या मध्ये खरीप पीके पुर्णपणे वाया गेले होते.विमा कंपनीने काही शेतकऱ्यांना २५% विमा अग्रीम म्हणून दिला परंतु राहिलेला ७५% विमा कोणत्या पिकासाठी किती टक्के विमा मंजुर झाला तो अद्याप मिळालेला नाही तो तात्काळ द्यावा. सन २०२३ चे सोयाबीन भाव फरकाचे अनुदान हेक्टरी ५ हजार रुपये शासनाने जाहीर केले



ते सर्व बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना अद्याप मिळालेले नाही ते तात्काळ वाटप करावे. सन २०२४ सालात खरीप हंगामात सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांची पिके वाया गेली त्यावेळेस शासनाने अनुदान जाहिर केले व विमा कंपनीकडुन किती टक्के नुकसान कोणकोणत्या पिकाला देण्यात येणार आहे ते तात्काळ द्यावे. गेल्या तीन महिन्यात हमी भावापेक्षा एक हजार रुपये कमी दराने सोयाबीन बाजारात विकल्या गेली जात आहे, त्यामुळे शेतकऱ्यांचे खुप मोठे आर्थिक नुकसान झालेले असुन त्यांना भाव फरकाचे किमान हेक्टरी दहा हजार रुपये भरपाई म्हणून शेतकऱ्यांना द्यावे असे लेखी निवेदनाव्दारे भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा ता.पाटोदा जि.बीड यांच्या मार्फत जिल्हाधिकारी बीड यांना कळविले आहे. तसेच माहितीस्तव बीड जिल्ह्याचे खासदार व सर्व आमदारांना निवेदनाची माहिती कळविलेली आहे.

# डिजिटल मीडिया परिषद युनिट राज्यभरात करणार - प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे

बीड/प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेशी संलग्नित असलेली डिजिटल मीडिया परिषद आगामी काळात आता जोमाने कामाला लागणार असून मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख सर यांच्या आदेशानुसार आपण संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात महत्वपूर्ण बैठका घेऊन डिजिटल मीडिया परिषदेच्या नवीन जिल्हा कार्यकारणी करण्यासाठी निर्णयघेणार असल्याचे मत डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी व्यक्त केले.

ते बीड मध्ये पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, महाराष्ट्र राज्यात मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या प्रत्येक जिल्हा पत्रकार



संघाशी आपण समन्वय साधून जिल्हा पत्रकार संघाच्या सहकार्याने संपूर्ण महाराष्ट्रात डिजिटल मिडिया परिषदेचे युनिट म्हणजेच नवीन जिल्हा कार्यकारिणी करण्या बाबत विशेषमहत्त्व देऊन नियोजनबद्ध प्रक्रिया राबवणार आहोत.प्रत्येक जिल्हास्तरावर बैठक घेऊन जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांच्या निवडी देखील जाहीर केल्या जाणार आहेत.महाराष्ट्रा तील जिल्हा पदाधिकारी यांनी नवीन निवडी संदर्भात सर्व माहिती तातडीने ९८२२५४८६९६ या वाटसअप नंबरवर मॅसेज करुन कळवावी. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात नवीन युनिट तयारकरण्या साठी सोपं होणार आहे. मराठी पत्रकार परिषदेशी संलग्न असलेल्या सर्व जिल्हा पत्रकार संघानी याबाबत दक्षता घेऊन तातडीने माहितीकळववावी असे देखील डिजिटल मिडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांनी कळविले आहे.



**लातूर ।प्रतिनिधी**

**राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात १०० दिवशीय क्षयरोग मोहीम राबविण्यात येत आहे. लातूर जिल्हा क्षयरोग केंद्र व वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालय व हॉस्पीटल यांच्या संयुक्त विद्यमाने आज वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालय व हॉस्पीटल येथे आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते निक्षय वाहनास हिरवा झेंडा दाखवून व क्षयरुग्ण शोध मोहीमेचे उद्धाटन करण्यात आले.**

**यावेळी प्रमुख पाहुने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिपक लांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.तांबारे एस.एन., मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, वसंतराव काळे होमिओपॅथीक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खामितकर एस.सी., उपप्राचार्य डॉ.अतुल कुलकर्णी उपस्थित होते.**

# बीड जिल्हा स्तरीय उल्हास मेळाव्यात शिरूर कासार तालुक्याचा सक्रिय सहभाग

मानूर ।प्रतिनिधी

दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत बीड जिल्हास्तरीय उल्हास नवसाक्षर जिल्हास्तरीय मेळावा स्काऊट भवन कार्यालय बीड येथे स.१० ते ५ या वेळेत अतिशय सुंदर व नियोजनबद्ध पद्धतीने संपन्न झाला. या मेळाव्यामध्ये बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यांनी उत्तमरीत्या सहभाग नोंदवत या मेळाव्याची शोभा वाढवली. शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या नियोजन व नेतृत्वाखाली या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रत्येक तालुक्याला विशेष विषयांची जबाबदारी सोपवण्यात आली होती.संबंधीत तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक तालुक्याला मिळालेल्या विषयाशी संबंधित स्टॉल तयार करून साहित्यानिशी सादरीकरण करावयाचे होते. यामध्ये शिरूर कासार तालुक्याने माननीय गटशिक्षणाधिकारी जमीर शेख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली दिलेल्या बाळाची निगा वजन ,उंची, लसीकरण ,आहार व स्वच्छता या विषयावर अतिशय सुंदर पद्धतीने सादरीकरण केले. मा. आदित्य जीवने साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या अध्यक्षतेखाली या मेळाव्याचे उद्घाटन संपन्न झाले. उल्हास नवभारत साक्षरता अभियान तालुक्यात कशा पद्धतीने राबवले याची यशोगाथा प्रत्येक तालुक्याने सादर केली. शिरूर कासार तालुक्याची यशोगाथा विभाग प्रमुख राजेंद्र जाधव सर यांनी उपस्थितांसमोर सादर केली एम.आर. शिरसाट सर यांनी स्वलिखित स्वच्छता गीत सादर करत उपस्थित सर्व मान्यवर व शिक्षक बांधवांची दाद मिळवली. यावेळी आपल्या तालुक्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशेष सत्कार केला. उल्हास नवभारत साक्षरता कार्यक्रमा अंतर्गत शिरूर कासार तालुक्यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल विभाग प्रमुख राजेंद्र जाधव सर व या कार्यक्रमांतर्गत विशेषांक तयार करण्यासाठी उत्कृष्ट कार्य करणारे शाहीर अनंत तिवारी सर यांचा मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने साहेब यांनी विशेष सत्कार केला. उद्घाटन सोहळा संपन्न झाल्या नंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी व मा.संजय पंचगल्ले साहेब शिक्षणाधिकारी योजना जिल्हा परिषद बीड व इतर सर्व मान्यवरांनी ११ तालुक्यांनी लावलेल्या स्टॉलला भेट देत सर्व स्टॉलची पाहणी केली. यावेळी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने साहेब या मेळाव्याचे प्रेरणास्त्रोत मा. संजय पंचगल्ले शिक्षणाधिकारी योजना बीड व इतर मान्यवरांनी शिरूर कासार तालुक्याच्या स्टॉलला भेट दिली. यावेळी का.भा. खेडकर सर केंद्रप्रमुख मानूर यांनी अतिशय सुंदर पद्धतीने दिलेल्या विषयाशी



सुंदर माहिती मान्यवरांना सादर केली. उल्हास जिल्हास्तरीय मेळाव्यात शिरूर कासार तालुक्याची टीम सहभागी झाली यासाठी विशेष मार्गदर्शन तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा.जमीर शेख साहेब यांनी केले तर या स्टॉलचे विभाग प्रमुख राजेंद्र जाधव यांनी उत्तम काम केले . सादरकर्ते म्हणून का.भा. खेडकर सर केंद्रप्रमुख मानूर, कैलास तुपे सर दहिफळे वस्ती, एम. आर. शिरसाठ सर व पानगे मॅडम यांनी उत्तम सहभाग नोंदवला.

# राजेंद्र गोरे यांची लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी

## निवड निवडीबद्दल सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांच्याकडुन सत्कार

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा येथील शिक्षक राजेंद्र गोरे सर यांची लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी नुकतीच निवड झालेली असून त्यांचा या निवडीबद्दल सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांच्याकडुन सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

लोकनेते गोपीनाथ मुंडे



शिक्षक सहकारी पतसंस्था पाटोदाच्या अध्यक्षपदी जेष्ट संचालक राजेंद्र गोरे यांची नुकतीच एकमताने बिनविरोध निवड झालेली असून निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी भेट देऊन गोरेसर यांचा सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी श्रीहरी गिते नगरसेवक ,डिगांबर नाईकनवरे,पत्रकार गणेश शेवाळे,पत्रकार सुनिल नाईकनवरे, डॉ.उद्धव गोरे,तुकाराम रंधवे,रंधवेसर,आरूण गवळी आदींची उपस्थिती होती.

# रमाई आवास योजना (घरकुल) चा सर्वांनी लाभ घ्यावा..!!

पाटोदा (प्रतिनिधी)

आ.सुरेश आणणा धस यांच्या प्रयत्नातून पाटोदा नगरपंचायत ला रमाई आवास योजनेतून १९६ घरकुल मंजूर करण्यात येणार असून गरजु



लाभार्थींनी व आधी लाभ घेतलेला नसवा व आवश्यक कागद पत्र उपलब्ध असणार्या लाभार्थ्यांनी दिन.२५/१२/२०२४ पर्यंत आपला अर्ज दाखल करावा व आधिक माहीती साठी न.प च्या रमाई आवास योजना विभागाशी संपर्क करावा आसे आव्हान सभापती किशोर आडागळे,व चेतन जावळे यांनी आव्हान केले आहे १) रमाई आवास योजना अर्ज २) पी टी आर स्वत: चा ३) आधार कार्ड ४) मतदार कार्ड ५) पॅन कार्ड ६) बँक पासबुक ७) राशन कार्ड ८) जातीचा दाखला ९) उत्पन्न प्रमाणपत्र १०) दारिद्र्य रेषेचे प्रमाणपत्र ११) न लाभ घेतलेला बाँड १२) जागेचा फोटो १३) रहिवाशी प्रमाणपत्र १४) पी आर कार्ड(भूमिअभिलेख) ईत्यादी कागदपत्रे अर्ज सोबत दाखल करावे असे आवाहन सभापती किशोर आडगळे व चेतन जावळे यांनी सांगितले आहे



# देशमुख खून प्रकरणातील मुख्य आरोपीस त्वरित अटक करा– कुंडलिक खांडे

बीड ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील मसाजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे भर दिवसा अपहरण करून त्यांचा एका टोळक्याने खून केला. हा प्रकार अतिशय निंदनीय आहे आणि लोकशाहीला काळीमा फासणारा आहे. देशमुख खून प्रकरणातील मुख्य आरोपीस जोपर्यंत अटक होत नाही तोपर्यंत बीड जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायत मध्ये कामकाज बंद आंदोलन करणार असा इशारा सरपंच उपसरपंच संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुंडलिक खांडे यांनी दिला आहे. एखाद्या लोकप्रतिनिधीची भर दिवसा अशा प्रकारे होणारी हत्या म्हणजे लोकशाहीचीच हत्या असल्याचेही कुंडलिक खांडे यांनी म्हटले आहे.





**बीड ।प्रतिनिधी**

**बीड जिल्हास्तरीय उल्लास मेळाव्यात गेवराई तालूक्याचा मतदान जनजागृती स्टॉल लावून तालूक्याचे नेतृत्व करण्याची संधी सहशिक्षिका शोभना दळवी यांना लाभली. गेवराईच्या स्टॉलला जिल्हा परिषद चे सीईओ आदित्य जीवने साहेब, शिक्षणाधिकारी फुलारी साहेब, शिक्षणाधिकारी(मा) शिंदे साहेब, शिक्षणाधिकारी (योजना) पंचकल्ले साहेब,उपशिक्षणाधिकारी बोराडे मॅडम, सारुक साहेब तसेच इतर अधिकारी यांनी आवर्जून भेट देत उपक्रमाचे विशेष कौतुक केले.**

# लेक मानसशास्त्र तज्ञ होते तेंव्हा.....!!

तीने आमच्या शिक्षण आणि करियरच्या पारंपारिक भावनाची चौकट मोडली ती बारावी पास झाल्यानंतर.. तीने अत्यंत आग्रहाने पुण्याच्या एसपी कॉलेज मध्ये सायकॉलॉजी मेजर विषय घेवून पदवी पूर्ण केली... त्यानंतर काही महिने दिल्लीत सायकॉलॉजीचे कोचिंग (स्पर्धा परीक्षा ) डोक्यात ठेवून केले... तिला दिल्लीत कॅट रेस बघून फार लवकर हे आपल्यासाठी दिवा स्वप्न ठरेल.. यात वर्षे वाया घालवण्यापेक्षा पुन्हा पदवीयुत्तर शिक्षण घेऊ म्हणून पुण्यात आली... अत्यंत मनातून तीने सायकॉलॉजी केलं... तिचे क्लिनिकल सायकॉलॉजी मधील शोध निबंध राष्ट्रीय आणि जागतिक दर्जाच्या जर्नल मध्ये प्रसिद्ध झाले... तीने गेली तीन वर्षे या विषयात स्वतःला वाहवून घेतलं आहे... ती नॉलेज अपडेटसाठी वेगवेगळे कोर्स करते आहे... मागे दिल्लीतल्या एक सेमिनारसाठी सेमिनार कंडक्ट करणाऱ्या संस्थेने त्यांच्या खर्चाने तिला बोलावले होते...ती आता विद्यार्थ्यांचे, पालकांचे उत्तम कौन्सिलिंग करते आहे.. हे तिच्यासाठी फक्त करियर नसून मानसिक आरोग्यामुळे समाजात अनेक प्रश्न निर्माण होत आहेत... त्यामुळे तिला तिच्या परीने यात सेवा द्यायची आहे.. म्हणून अत्यंत तन्मयतेने ती काम करते आहे.. तिला अनेकजण कौन्सिलिंगसाठी विचारतायत त्यामुळे येत्या काही महिन्यात ती तिची स्वतःची जनरल प्रॅक्टिस पुण्यात सुरु करणार आहे... ती अत्यंत समर्थपणे हे सगळं करत असल्याचे बघून बाप म्हणून खुप समाधान वाटले... आज तिचा एक मुलांना कौन्सिलिंग करतानाचा फोटो पाहुन लिहायची इच्छा झाली... कदाचित तिला हे आवडणार नाही पण लेकराबद्दलचं मनातल्या कौतिकाची भरती थांबत नव्हती म्हणून हक्काचे ठिकाण म्हणून इथं मन रीतं केलं...!!युवराज पाटील,( जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव)



# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रयोगास प्रथम पारितोषिक

## प्राथमिक गटामध्ये ' स्मार्ट स्पेक्ट ' प्रथम

प्रतिनिधी ।धारूर

नैसर्गिक शेती कचरा व्यवस्थापन अंतर्गत कचऱ्यापासून वीजनिर्मिती या माध्यमिक गटातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रयोगास तालुकास्तरीय प्रथम पारितोषिक मिळाले आहे .या विद्यार्थ्यांच्या अभिनंदन होत असून जिल्हास्तरासाठी प्रयोगाची निवड झाली आहे .धारूर येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेमध्ये तालुकास्तरीय दोन दिवशीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते .प्रदर्शनामध्ये तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक तसेच शिक्षक असे मिळून ७० शाळा सहभागी झाल्या होत्या .या प्रदर्शनामध्ये नैसर्गिक शेती , कचरा व्यवस्थापन , संगणकीय विचार , सेंद्रिय शेतीआरोग्य व स्वच्छता यासह विविध विषयवर आधारित प्रदर्शनाचे सादरीकरण



विद्यार्थी , शिक्षकांनी केले होते .दोन दिवसीय प्रदर्शनामध्ये सादरीकरण करण्यात आलेल्या प्रयोगामध्ये जिल्हास्तरासाठी प्रयोगाची निवड करण्यात आली आहे .यामध्ये जनता माध्यमिक विद्यालय धारूर येथील विद्यार्थ्यांनी कचऱ्यापासून वीजनिर्मिती या प्रयोगाचे सादरीकरण केले होते .यामध्ये सायली पवार व साक्षी गुन्हाल या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेऊन प्रयोग तयार केला होता .कचरा जळल्यानंतर उष्णता निर्माण होऊन त्यापासून पाणी गरम करून त्याची वाफ होते . त्या वाफेवर जनरेटर चालू झाल्याने वीजनिर्मिती होते .सुका कचरा , प्लास्टिक कागद , तीन टर्बाईन , बॉयलर, जनरेटर आधी साहित्यापासून विद्यार्थ्यांनी कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प तयार केला आहे .या प्रयोगासाठी आठ दिवसाचा कालावधी लागला होता .प्रयोगासाठी शिक्षक अमोल गुळवे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले होते .याचबरोबर प्राथमिक गटातून जनता प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी संगणकीय विचार यामध्ये स्मार्ट स्पेक्ट हा प्रयोग बनवला होता . या प्रयोगास प्रथम पारितोषिक मिळाले आहे .माध्यमिक गटात माती विना हिरवा चारा या नूतन माध्यमिक विद्यालय अंजनडोह येथील विद्यार्थ्यांनी बनवलेल्या विद्यार्थ्यास द्वितीय क्रमांक मिळाला आहे .जिजामाता विद्यालयातील किरण तिडके यांनी अन्न, आरोग्य , स्वच्छता या प्रयोगास प्राथमिक गटात द्वितीय क्रमांक मिळाला आहे .शिक्षकांनी सादर केलेल्या प्रयोगामध्ये कल्पना साखरकर यांनी एफएलएन अंतर्गत शैक्षणिक साहित्याची निर्मिती तर आहार आणि आरोग्य जीवन वस्तू या नूतन माध्यमिक विद्यालयातील प्रतिभा राऊत यांच्या प्रयोगास द्वितीय क्रमांक मिळाला आहे .निवड झालेल्या प्रयोगांच्या विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे .इतरही विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा अशा विविध प्रयोगाचे सादरीकरण केले होते

# सोयाबीन हमीभाव खरेदी ऑनलाईन नोंदणीसाठी शेवटची तारीख १५ डिसेंबर शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा - सभापती रमजान तांबोळी

आष्टी (प्रतिनिधी)

हंगाम २०२४ - २५ मध्ये केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत माजी मंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने नाफेडच्यावतीने आष्टी तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथे शासकीय खरेदी केंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन नोंदणी सुरू झाली, ऑनलाईन नोंदणीची शेवटची दि. १५ डिसेंबर



२०२४ असून शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.कडा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे माजी मंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने जामगाव सेवा सोसायटीला शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांस मंजुरी मिळाली आहे. शेतकऱ्यांनी सातबारा, आधारकार्ड, बँक पासबुक, सातबारा व आठ अ मूळप्रत ई पीक पाहणी केलेली नोंद इत्यादी कागदपत्रासह प्रत्यक्ष येऊन नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. सध्या खाजगी व्यापारी हमीभावापेक्षा कमी भावाने माल खरेदी करत असून शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन ४८९२ रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळणार आहे. शेतकऱ्यांनी शासकीय हमीभाव सोयाबीन खरेदी योजना २०२४ ची ऑनलाईन करण्याची शेवट तारीख १५ डिसेंबर पर्यंत असून शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# बांगलादेशात हिंदूवर धर्माच्या आधारे होत असलेल्या अमानवीय अत्याचाराविरुद्ध तसेच अँड रमेश रॉय यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ

## बीड जिल्हा वकील संघाचे जिल्हाधिकाऱ्यांना तीव्र निषेधार्थ निवेदन

बीड ।प्रतिनिधी

बांगलादेशमध्ये मागील चार महिन्यापासून हिंदू धर्मियांवर धर्माच्या नावाखाली अन्याय अत्याचाराची परिसीमा ओलांडली जात आहे.अँड रमेश रॉय यांच्यावर जीवघेणा भ्याड हल्ला करण्यात आला आहे. या घटनेच्या निषेधार्थ मानवी हक्क दिनाचे औचित्य साधून बीड जिल्हा न्यायालयातील तमाम वकील आणि वकील भगिनी यांनी जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन देऊन यासंदर्भात सरकारने योग्य ती पावले उचलावीत असे निवेदन केले आहे.

सन १९४८ पासून १० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिवस म्हणून साजरा केला जातो. परंतु, दिनांक ०५ ऑगष्ट, २०२४ पासून बांग्लादोशामध्ये पंतप्रधान शेख हसिना यांचे सरकारला पायउतार करून, तेथील हिंदू धर्मीय नागरीकांवर धर्माच्या आधारावर लक्ष्य करून जिहादी मानसीकतेचे लोक त्यांचेवर अनन्दीत अराजक पध्दतीने अत्याचार करत आहेत. बांग्लादेशात मागील सुमारे चार महिन्यांपासून हिंदु धर्मीयांना मारहाण, खून, लुटालूट, नासधूस अशा प्रकारे जिवीतहानी होत आहेत. तसेच, बांग्लादेशातील हिंदूंची घरे जाळने, व्यवसायाची ठिकानी, शेती. फळबागा व फळझाडांचे नुकसान करने व इतर मालमत्तचे मोडतोड व तोडफोड करून नुकसान करने, घरातील मौल्यवान साहित्य लुटून नेणे, असे प्रकार मोठ्या प्रमाणावर चालू आहेत. बांग्लादेशातील हिंदू मंदिरे पाडण्यात येत आहेत




व त्यांची नासधूस करण्यात येत आहे. निरपराध लोकांना विना- अपराध अटक करून जेल मध्ये डांबण्यात येत आहे.

तसेच, इस्कॉनचे संत श्री. चिन्मय कृष्ण दास प्रभू जी यांची मा. न्यायालया समोर बाजू मांडणारे विधिज्ञ ॲड. रमेश रॉय यांचेवर देखील जिहादी मानसीकतेच्या लोकांनी भ्याड हल्ला करून, त्यांना गंभीर जखमी केले आहे. बांग्लादेशातील हिंदुंना अमानवीय स्वरूपाची वागणूक देण्यात येत असून, त्यांच्या मूलभूत मानवीय हक्कांची पायमलली करून, त्यांना जिवन जगणे अतिषय कठीन बनवले आहे.जागतीक स्तरावर सदर बाबींची नोंद घेवून निषेध नोंदवण्यात येत आहेत. बांग्लादेशात सत्ता परिवर्तना नंतर तेथील सध्याच्या अंतरिम सरकारचे प्रमुख श्री. मोहम्मद युनूस हे अशा प्रकारच्या घटनांबाबत कांहीही कार्यवाही करत नाहीत व एक प्रकारे जिहादी मानसीकतेचे मूक समर्थन करत आहेत. आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचे आधी भारत व बांग्लादेशातील हिंदु बांधव एकच होते व आजही आहेत.

बांग्लादेशात हिंदु धर्मीय नागरीकांवर धर्माच्या आधारवर अन्याय अत्याचार करणाऱ्या जिहादी मानसीकतेच्या लोकांचा आणी इस्कॉनचे संत श्री. चिन्मय कृष्ण दास प्रभू जी यांचे विधिज्ञ ॲड. रमेश रॉय यांचेवर भ्याड हल्ल्याचा बीड जिल्हा वकिल संघाचे विधीज्ञांचे चतिने तिव्र स्वरूपात निषेध व्यक्त करण्यात येत आहे. तसेच, निरअपराध असून देखील अटक करून जेलमध्ये डांबून ठेवलेले इस्कॉनचे संत श्री. चिन्मय कृष्ण दास प्रभू जी यांना तात्काळ मुक्त करण्याचे कळवून, अशा प्रकारची मानसकीता बाळगणाऱ्या लोकांवर तात्काळ कठोर कार्यवाही करण्याचे सूचीत करण्यात यावे, अशी मागणी बीड जिल्हा वकील बांधव आणि भगिनी यांनी जिल्हाधिकारी बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.




## बांगलादेशातील हिंदु बांधवांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात शिरूर शहरात भव्य मोर्चा

मानूर ।प्रतिनिधी

बांगलादेशातील हिंदु बांधवांवर होणाऱ्या अन्याय आणि अत्याचाराच्या विरोधात शिरूर शहरात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी मोर्चेकऱ्यांनी दिलेल्या घोषणांनी शहर दुमदुमून गेले होते.सिद्धेश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत गांधी चौकातून मोर्चाला सुरुवात झाली.सदरील मोर्चा श्रीराम मंदिर सुतारनेट,जुना वाडा,सोनार गल्ली,मुख्य पेठ मार्गे छत्रपती संभाजी महाराज चौकातून पोलीस स्टेशन मार्गे जिजामाता चौकात पोहचला.या वेळी मोर्चात संकटात हिंदू तर मदतीला लाखो बंधू,बांगलादेश में अत्याचार मानवाधिकार खोलो आंख,चिन्मय कृष्णदास जी की रिहाई करो,मानवता की रक्षा करो,बांगलादेश में अत्याचार बंद करो बंद करो अशा घोषणा देण्यात आल्या.जागतिक मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून शहरासह तालुक्यातील हिंदू बांधवांनी या मोर्चाचे आयोजन केले होते.जिजामाता चौकात मोर्चा पोहचल्यानंतर मोर्चेकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.त्या मध्ये डॉ.संतोष सानप, प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर,दिनेश गाडेकर,सोपान मोरे,विठ्ठल कंठाळे,गोकुळ पवार,गोरख महाराज कनुजे,स्वामी विवेकानंद शास्त्री यांचा सहभाग होता.मोर्चात कसलाही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.या वेळी मोर्चेकऱ्यांच्या वतीने नायब तहसीलदार बाळू काका खेडकर यांना निवेदन देण्यात आले.

# बांगलादेशातील हिंदूवर होणाऱ्या अन्यायाविरोधात वडवणीत धरणे आंदोलन

## हिंदू न्याय पायी रॅली काढून केला निषेध व्यक्त

वडवणी ।प्रतिनिधी

आज दिनांक १०/१२/२०२४ मंगळवार रोजी वडवणी शहरात बांगलादेशातील हिंदूवर होणाऱ्या अन्यायाविरोधात छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय पर्यंत पायी रॅली काढून तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत निषेध व्यक्त करण्यात आला आहे. यावेळी सकल हिंदू समाज वडवणी तालुक्याच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.

बांगलादेशातील हिंदू बांधवांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी मानवाधिकार दिनाचे औचित्य साधून दि.१० डिसेंबर रोजी वडवणी शहरात हिंदू न्याय यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ११ वाजता वडवणी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते वडवणी तहसील कार्यालय दरम्यान हिंदू न्याय यात्रा पायी रॅली संपन्न झाली. त्यानंतर




तहसील कार्यालयासमोर जाऊन मानवाधिकार परिषदने हिंदूवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची कधीच दखल घेतलेली नाही. बांग्लादेशात हिंदुवर आणि अन्य अल्पसंख्य समुदायावर अनन्वित अत्याचार होत आहे. संयुक्त राष्ट्र आणि मानवाधिकार परिषद याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे. बांग्लादेशात हिंदू संत,मंदिर,हिंदू संस्था असुरक्षित असून दररोज हल्ले होत आहे. भारत सरकार जागतिक पातळीवर बांगलादेशी हिंदूंच्या रक्षणासाठी प्रयत्न करत आहे. त्याला हिंदूंच्या दबावामुळे यश येईल. हिंदू समाजबांधव आज जगातील शंभरपेक्षा अधिक देशात कमी अधिक प्रमाणात वास्तव्य करत आहेत त्यांना शांतीपूर्वक जगण्याचा अधिकार आहे. हिंदू बांधवांवर जगात कुठेही अन्याय झाला तर त्याचा हिंदू समाजाकडून तीव्र निषेध आणि विरोध होईल हा संदेश पूर्ण जगात जाणे आवश्यक आहे. हिंदू समाज भारतात बहुसंख्य असला तरी जागतिक पातळीवर आपण अल्पसंख्य आहोत त्यामुळे संयुक्त राष्ट्राने गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे. बांगलादेशातील आपल्या बांधवांना वाचवण्यासाठी प्रत्येक गावात,शहरात, तालुक्यात आंदोलन सुरू असून बांगलादेशी हिंदूंच्या रक्षण करण्यात यावे आणि चिन्मय कृष्णा महाराज यांची सुटका करण्यात यावी,हिंदूंच्या धार्मिक स्थळ आणि मंदिरांचे संरक्षण करावे. अशी मागणी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे मागणी केली आहे. यावेळी बांगलादेश विरोधात प्रचंड घोषणाबाजी करण्यात आले असून यावेळी वडवणी तालुक्यातील हिंदू सकल समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागरिकांनी आपल्या मानवी हक्काबाबत जागरूक राहावे - डॉ. यशवंत वळवी

लातूर ।प्रतिनिधी

आपल्याला सन्मानाचे जीवन जगावयाचे असल्यास नागरिकांनी आपल्या मानवी हक्काबाबत जागरूक असले पाहिजे, असे प्रतिपादन येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. यशवंत वळवी यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, व्यक्तिमत्त्व विकास व स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मानवी हक्क दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते, तर विचारपीठावर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संजय पवार, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके, प्रा. डॉ. अश्विनी रोडे, कार्यालयप्रमुख नामदेव बेंदरगे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन झाले.अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, मानवाला निसर्गतः जीवन जगण्याचा अधिकार निसर्गानेच बहाल केला आहे. संविधानाने लेखन, भाषण स्वातंत्र्य, गुलामगिरीतून मुक्तता, कोर्ट सुनावणीचे अधिकार धार्मिक, वैचारिक स्वातंत्र्य भारतीय नागरिकांना बहाल केला आहे. सजग नागरिकांनी आपल्या हक्क, अधिकाराचा कर्तव्याची जाणीव ठेवून विधायक उपयोग केल्यास लोकशाहीला बळकटी प्राप्त होईल असे ते म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर




बेडगे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. किसनाथ कुडके यांनी केले तर आभार डॉ. अश्विनी रोडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीकरिता प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रवींद्र सोनवणे प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा.विष्णू ततापुरे, आनंद खोपे आणि राजाभाऊ बोडके आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मस्साजोग खुण प्रकरणातील आरोपींना तत्काळ अटक करा – गणेश बजगुडे पाटील

बीड ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची काल निर्घुण हत्या करण्यात आली असुन २४ तास उलटुन देखील आरोपीना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. हा प्रकार अतिशय निंदनीय व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारा असुन या प्रकरणाचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व शिवक्रांती संघटनेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करत आरोपींना तत्काळ अटक करण्याची मागणी शिवक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे काल दिनांक ०९ डिसेंबर रोजी दुपारच्या दरम्यान अपहरण करून त्यांची अतिशय निर्घुण हत्या करण्यात आली असुन याप्रकरणाला २४ तास उलटुन देखील अद्याप आरोपी समोर आलेले नाहीत. ही बाब अतिशय गंभीर व निंदनीय असुन महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळीमा फासणारी आहे. २४ तास उलटुन देखील आरोपी सापडत नाहीत यामुळे नातेवाईकानी मृताचे प्रेत ताब्यात घेण्यास नकार देत या घटनेच्या निषेधार्थ मसाजोगसह केज तालुक्यातील जनता रस्त्यावर उतरलेली आहे. जिल्ह्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी बघ्याची भुमिका नघेता



याप्रकरणाकडे तत्काळ लक्ष घालुन आरोपींना अटक करण्याची मागणी शिवक्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केली आहे.



# आपला धर्म आणि संस्कृती टिकवायची असेल तर प्रत्येकाने जागृत राहण्याची गरज – आमदार बबनराव लोणीकर

जालना ।प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून बांगलादेशात प्रचंड मोठा हिंसाचार उफाळला असून बांगलादेशी हिंदूवर झालेल्या हल्ल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या नाहीत असा दिवस जात नाही. बांगलादेशात १ कोटी ३१ लाख हिंदूंच्या जीवाला आज धोका आहे. त्या ठिकाणी कधी मंदिरे पाडली जात आहेत, तर कधी पुतळे तोडले जातात, हिंदू प्रतीकांची विटंबना केली जात आहे, या सर्व अन्यायाविरोधात आवाज उठवणारा किंवा निषेध करणाऱ्या हिंदूंच्या हत्या केल्या जातात. अनेक व्हिडिओ असे आहेत जे आपल्यासारख्या सहिष्णू हिंदू बांधवांना बघता येणे अशक्य आहे. आपण बघितलेल्या प्रत्येक व्हिडिओमध्ये हिंदूवर अत्यंत क्रूरपणे त्रास दिलेला दिसून येत आहे. या ठिकाणी हिंदूवर होणारे हल्ले आणि धमक्यांची तीव्रता वाढत आहे. याची दखल घेत बांगलादेशातील कट्टरवाद्यांना धडा शिकवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केले.

परतुर येथे बांग्लादेशमधील हिंदू धर्मीयांवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात जाहीर निषेध व्यक्त करण्यासाठी हिंदू न्याय मोर्चा काढण्यात आला यामध्ये सर्वच हिंदुत्ववादी संघटना सहभागी झाल्या होत्या याप्रसंगी आमदार बबनराव लोणीकर बोलत होते पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, बांग्लादेशामध्ये हिंदू समाजावर मुस्लिम कट्टरपंथीयांद्वारे अत्याचार होत आहे याचे तीव्र पडसाद देशभरासह राज्यातील विविध ठिकाणी दिसून येत आहे. यावेळी आयोजित हिंदू न्याय मोर्चामध्ये निषेधाचे फलक झळकावत बांग्लादेश सरकार विरोधी घोषणा देण्यात आल्या. बांग्लादेशामध्ये हिंदू समाजावर मुस्लिम कट्टरपंथीयांद्वारे अत्याचार होत आहेत. तेथील मंदिरे, घरे, दुकाने जाळली जात आहेत. हिंदू महिलांवर देखील अमानविय पद्धतीने अत्याचार होत आहेत. ही बाब अत्यंत दुःखदायक असून सकल हिंदू समाजाच्या वतीने या घटनेचा यावेळी निषेध आला. तसेच हिंदूंच्या सन्मानासाठी केंद्र सरकार व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने यावर कठोर भूमिका घ्यावी अशी मागणी देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह सर्वच हिंदुत्ववादी संघटनांनी निवेदनाद्वारे केली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# विभागातील सर्व जिल्ह्यांनी ध्वजदिन निधी संकलन इष्टांक पूर्ण करावा- विभागीय आयुक्त दिलीप गावडे

## नव्या वर्षापासून जिल्हा प्रशासनाचा प्रत्येक महिन्यात 'एक दिवस सैनिकांसाठी'

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

देशाच्या सिमांचे रक्षण करण्याचे कर्तव्य बजावतांना प्रसंगी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या सैनिकांप्रती संपूर्ण देश नतमस्तक व कृतज्ञ आहे. अशा सैनिकांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी उभारल्या जाणाऱ्या ध्वजदिन निधीत योगदान देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विभागातील सर्व जिल्ह्यांनी आपापल्या जिल्ह्यात ध्वजदिन निधी संकलनासाठी दिला जाणारा इष्टांक पूर्ण करावा,असे निर्देश विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिले.जिल्हा प्रशासन येत्या सन २०२५ पासून दर महिन्यातील एक दिवस सैनिकांसाठी हा उपक्रम राबविण्यात येणार असून या दिवशी सैनिकांचे, माजी सैनिकांचे,त्यांच्या अवलंबितांची कामे विशेषत्वाने मार्गी लावण्यात येतील,असा संकल्प जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ध्वजदिन निधी संकलन प्रारंभा प्रसंगी व्यक्त केला.

जिल्ह्यातील ध्वजदिन निधी संकलनाचा प्रारंभ आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते करण्यात आला. मौलाना आझाद संशोधन केंद्र येथील सभागृहात आज हा समारंभ पार पडला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर(निवृत्त) सय्यदा फिरासत, मेजर सुभाष साळवे, विंग कमांडर जाधव, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क क्षीरसागर तसेच माजी सैनिक, त्यांचे कुटुंबीय, वीरमाता, वीर पत्नी, वीर पिता आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते शहिद स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व वीरमाता, वीर पत्नी, वीर पिता यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात कामगिरी बजावणारे माजी सैनिक, त्यांचे पाल्य यांनाही गौरविण्यात आले.

आपल्या संबोधनात पोलीस अधीक्षक राठोड म्हणाले की, कोणत्याही देशाच्या प्रगतीमागे देशाच्या सीमा सुरक्षित असणे हे सगळ्यात महत्त्वाचे कारण असते. त्यासाठी योगदान देणारे सैनिक हे आपल्या देशाच्या प्रगतीला कारणीभूत असतात. त्यासाठी ते प्रसंगी प्राणाचे बलिदान देतात. त्यामुळे त्यांच्याप्रती कृतज्ञ असणे हे आपल्या सगळ्यांचे कर्तव्य आहे.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, जिल्ह्याला ध्वजदिन निधी संकलनासाठी १ कोटी २० लक्ष रुपये इतके उद्दिष्ट असले तरी जिल्हा १ कोटी ५० लक्ष इतके निधी संकलन करुन राज्यात प्रथम क्रमांक मिळवेल. या निधी संकलनात सगळ्यांनी आपला वाटा उचलावा. याशिवाय जिल्हा प्रशासन प्रशासकीय कामकाजात दर महिन्याला एक दिवस सैनिकांसाठी हा उपक्रम राबवुन सैनिकांचे त्यांच्या कुटुंबियांचे प्रशासनाच्यास्तरावरची कामे पूर्ण करेल. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी सांगितले की, विभागातील सर्व जिल्ह्यांनी आपापल्या जिल्ह्यात दिलेले ध्वजदिन निधी संकलनाचे इष्टांक प्राधान्याने पूर्ण करुन संपूर्ण विभाग ध्वजदिन निधी संकलनात अव्वल ठेवावा,असे निर्देश त्यांनी दिले.



# बन्नाळी गावाकऱ्यांचा उपविभागीय कार्यालयावर आक्रोश मोर्चा धडकला

धर्माबाद ।प्रतिनिधी

धर्माबाद पासून जवळच असलेल्या बन्नाळी येथे गेल्या दोन दिवसापूर्वी एका गाईची आणि वासराची अज्ञातांकडून तस्करी चोरी होत असतानाचे सीसीटीव्ही फुटेज गावकऱ्यांनी लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेरा मध्ये कैद झाले आहे, सदरील घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन बन्नाळीच्या गावकऱ्यांनी धर्माबाद पोलीस स्टेशन येथे रीतसर तक्रार ही दिली परंतु तक्रारीची कुठलीही चौकशी न करता अत्यंत संथ पद्धतीने तपास चालू आहे, पोलिसांनी बन्नाळी ग्रामस्थाची बोळवण पाठवणूक केली होती,परंतु गावकऱ्यांच्या भावना संतप्त झालेला असल्यामुळे व याहीपूर्वी असा प्रकार गावात घडलेला असल्यामुळे संतप्त गावकऱ्यांनी आज सोमवारी उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत संपते यांच्या कार्यालयावर शंभर ते दीडशे गावकऱ्यांचा मोर्चा घेऊन जाऊनच उपविभागीय अधिकारी प्रशांत संपते निवेदन दिले.महाराष्ट्र सरकारने गोमातेला राजमातेचा दर्जा दिला असून या राजमातेची होत असलेली तस्करी पोलीस प्रशासन जर थांबू शकत नसेल तर ही बाब अत्यंत चिंताजनक आहे अशी ही प्रतिक्रिया बन्नाळीच्या ग्रामपंचायत सदस्य व सरपंचांनी दिलेले आहे ग्रामपंचायतीच्या लेटरहेडवर हे निवेदन देण्यात आले असून मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्यासह पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी तहसीलदार या सर्वांना या निवेदनाच्याप्रती देण्यात आलेले आहेत

या घटनेचा तपास करण्यासाठी असलेले बीट जमादार सोमनाथ मठपती यांना या घटनेचे कुठलेही गांभीर्य नसल्याने यांची सुद्धा या बीट मधून बदली करावी असेही निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेला आहे या निवेदनाची तीव्रता पाहता उपविभागीय अधिकारी प्रशांत संपते हे काय कारवाई करतात ह्याकडे धर्माबाद वासियांचे लक्ष लागले आहे.

सदरील घटना घडून दोन ते तीन दिवस झाले, तरी सुद्धा बन्नाळी गावाचे बिट जमादार यांच्याकडून कोणतीच आणि कसल्याच प्रकारची चौकशी करतांना दिसत नाहीत, बिट जमादार यांच्याकडून गावाकऱ्यांना असे उत्तर देतात की माझ्या हद्दीत एकच बिट नाही? मला दुसऱ्या बिटचे पण बगावे लागते असे गावाकऱ्यांना उडवा उडवीचे उत्तर देतात,त्यासाठी गावाकर्यांनी निवेदनमध्ये असे उल्लेख केले की बन्नाळीचे बिट जमादार यांची बदली करून नवीन बिट जमादार देण्यात यावे असे गावाकर्यांनी उपविभागीय अधिकारी प्रशांत संपते यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

# हेळंब येथील श्री खंडोबा यात्रेतील कुस्ती स्पर्धेत लक्षवेधी लढती हेळंब येथील तीन दिवशीय खंडोबा यात्रोत्सवाची उत्साहात सांगता

परळी ।प्रतिनिधी

तालुक्यातील हेळंब येथे ग्रामदैवत श्री खंडोबा यात्रा महोत्सवानिमित्त प्रतिवर्षी शनिवार दि.७ ते ९ डिसेंबर रोजी घेण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धेत नामवंत मल्लांनी हजेरी लावली होती. या कुस्ती स्पर्धेमध्ये १०० रूपया पासुन ते २१,१०१/- पर्यंतच्या कुस्त्या लावण्यात आल्या. तसेच कुस्त्या पाहण्याची संधी कुस्तीप्रेमींना मिळाली. या कुस्ती स्पर्धेस बीड,लातुर, उस्मानाबाद, परभणी, या जिल्ह्यातुन पहेलवानांचा प्रतिसाद मिळाला. विविध ठिकाणच्या मल्लांनी सहभाग होता. यांच्यातील रोमहर्षक लढतीत प्रथम क्रमांकाची कुस्ती पै.दीपक कराड यांनी विजय संपादित केला.डोळ्यांचे पारणे फेडणारे प्रेक्षणीय सामन्यांचा आनंद प्रेक्षकांनी घेतला. शिवाय १००, ५००, १०००,१५००, २०००, ५००० तसेच शेवटी बक्षीस २१,१०१ हजार रूपये बक्षीसांच्या कुस्त्या लावण्यात आल्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी विधान परिषद सदस्य संजय दौड यांनी श्री खंडोबा मंदिर येथे दर्शन व यात्रोत्सवात भेट दिली. तसेच कुस्ती स्पर्धाभेट दिली. या कार्यक्रमास तलाठी विष्णू गित्ते, पुरवठा अधिकारी बालाजी कचरे, पोलिस निरीक्षक अनमोल केदार, बालाजी आंधळे, बालाजी होळबे, बाबा होळबे हे उपस्थित होते. पंच म्हणून इंद्रजित होळंबे नाथराव आंधळे अंगद आंधळे अशोक आंधळे नाथराव आंधळे परमेश्व होळंबे राजेभाऊ पाळवदे यांनी काम पाहिले. चित्तथरारक सामने पाहण्यासाठी

## हलगीच्या तालावर हेळंब येथे रंगली कुस्त्यांची दंगल
## कुस्तीचा थरार पाहण्यासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थांची गर्दी



तालुक्यातील विविध गावचे हजारों कुस्तीप्रेमींना उपस्थित होते. या कुस्तीचे सामने यशस्वी करण्यासाठी हेळंब येथील ग्रामपंचायत व ग्रामस्थ आदींनी परिश्रम घेतले.

**तीन दिवशीय खंडोबा यात्रेची मोठ्या उत्साहात सांगता**

खंडोबा यात्रेनिमित्त मराठवाड्याच्या कानाकोपर्यातुन भक्त दर्शनासाठी आले होते. तीन दिवशीय यात्रा उत्साहात झाली. शनिवारी दि. ०७ डिसेंबर रोजी सकाळी गावातुन खंडोबाची पालखी वाजत गाजत काढण्यात आली. यळकोट यळकोट जय मल्हार च्या जयघोषाने हेळंब परिसर दणाणुन गेले होते. पालखीचे ठिक ठिकाणी ग्रामस्थांनी दर्शन घेतले. शोभेची दारु उडवणून पालखीचे स्वागत करण्यात आले. पालखीवर भंडारा उधळण्यात आला. ग्रामस्थ पालखी सोहळ्यात उत्साहाने सहभागी झाले होते. रविवारी वाघ्या मुराळ्याचा कार्यक्रम झाला. सोमवारी कुस्त्यांची स्पर्धा घेण्यात आली.

**यात्रेनिमित्त दर्शनासाठी व खेळणीचे दुकानावर गर्दी**

श्री.खंडोबा यात्रोत्सवा निमित्ताने राज्यातुन, जिल्ह्यातुन, तालुक्यातील , ग्रामस्थ व परिसरातील भाविकांची मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी गर्दी केली होती. श्री खंडोबा मंदिर परिसरात मोठी यात्रा भरत असल्याने परिसरात खाद्य पदार्थ, खेळणी, वस्तू आदींसह विविधव वस्तू खेरदी व दर्शना साठी भाविकांची गर्दीहोत आहे. यात्रेनिमित्त खेळणीचे दुकाने थाटली होती. भाविकांची गर्दी होत असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने यात्रा समितीने व परळी ग्रामीण पोलीस स्टेशनच्या वतीने परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी चोख बंदोबस्तठेवण्यात आला होता.यावेळी ग्रामस्थांनी व भक्त मंडळीनी तीन दिवशीय यात्रोत्सव कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

### हलगीने वाढविली कुस्तींमध्ये रंगत

तालुक्यातील हेळंब येथे श्री. खंडोबा यात्रेनिमित्त कुस्ती स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये या कुस्ती दंगलींमध्ये अनेक जिल्ह्यातील पहेलवांनी आपले कसब दाखवीत होते. दरम्यान हलगीच्या तालावर पहेलवानांचा देखील उत्साह संचारला होता. कुस्ती म्हटली म्हणजे हलगी आली. कुस्त्यांमध्ये जसजशी चुरस वाढत होती. तसे तसे हलगीच्या ताल कुस्तींपटूंमध्ये उत्साहत संचारत होता. त्यामुळे हलगीने कुस्तींमध्ये रंगत वाढविली होती. चित्तथरारक सामने पाहण्यासाठी तालुक्यातील विविध गावचे हजारों कुस्ती प्रेमीं उपस्थित होते.

# रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी प्रस्ताव सादर करावेत- आ.संदीप क्षीरसागर

## कुठल्याही स्तरावर पैशांची मागणी झाल्यास तक्रार करण्याचेही आवाहन

बीड ।प्रतिनिधी

रमाई आवास घरकुल योजनेसाठी समाजकल्याण विभागाकडून नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून निकषांची पुर्तता करणार्या लाभार्थ्यांनी आपल्या ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक कागदपत्रांसह आपले प्रस्ताव दाखल करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

रमाई आवास योजना (ग्रामीण) या अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकातील लोकांसाठी असलेल्या घरकुल योजनेसाठी समाजकल्याण विभागाकडून बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड तालुक्यासाठी ७२० व शिरूर-कासार तालुक्यासाठी २४० इतके उद्दीष्टांना मंजुरी दिली आहे. याअनुषंगाने समाजकल्याण विभागाकडून पंचायत समितीमार्फत निकष पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज, प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यामुळे निकषांची पुरवण्या करणार्या अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकातील पात्र लाभार्थी यांनी आपले अर्ज ग्रामपंचायतीच्या



माध्यमातून सदरील योजनेसाठी दाखल करावेत असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

**पैशांची मागणी झाल्यास संपर्क करा**

दरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी रमाई आवास योजनेच्या प्रक्रियेत कुठल्याही स्तरावर पैशांची मागणी किंवा आर्थिक गैरव्यवहार झाल्यास मो.नं.९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# बांधकाम कामगारांची ऑनलाईन नोंदणी/ नुतणीकरण पुर्ववत करा - कृती समिती

बीड : इमारत बांधकाम कामगारांची नोंदणी पुर्वी कामगार स्वता: करीत होता ती पुर्ववत करा या व इतर मागण्यावर कृती समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.सदर कृती समितीच्या अध्यक्षपदी राजकुमार घायाळ यांची निवड एकमुखाने करण्यात आली कृती समितीचे बाकी पदाधिकारी यांची निवड सर्व संघटनाना विश्वासात घेवून करण्यात येणार आहे.

हमाल भवन जुना मोंढा बीड येथे जिल्हातील बांधकाम कामगार संघटना मोठया संखेने सहभागी झाल्या यावेळी येणर्या अडचणी बाबत अजीत मोरे,शेख सादेक,मैनूद्दिन शेख,अझर सिदीकी,कॉ.सादेक पठाण,रवि मुडेगावकर,शेख मुनाफ,शेख युनूस,प्रतिक राऊत,भारत देशमाने,विठ्ठल खेत्रे,राजु भोले,कॉ.बी.जी.खाडे,नवीद खान,शेख रहीमभाई,समीर शेख,इम्रान फारोकी,गणेश वीर,यांनी बांधकामा कामगारांच्या अडचणी व मंडळाकडून होणारी फसवणूक याबाबत



सविस्तर चर्चा केली व पुढील विषयावर जिल्हात आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला बांधकाम कामगाराची नोंदणी,नुतणीकरण पुर्ववत करावी, गेल्या काही कालावधीत बीड कार्यालयात बोगस पद्धतीने केलेल्या कामगार नोंदणीची संबधीताना निलंबीत करुन चौकशी करुन गुन्हे दाखल करावेत, लाभाचे प्रकरणात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करावी व संबधीतावर कारवाई करणे,कामाचे ९० दिवसाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी कंत्राटदार मिस्त्री व मुकादामना चौकशी करुन नियोक्ता प्रमाणपत्र देण्याबाबत तात्काळ कारवाई करावी या व इतर मागण्यासाठी जिल्हयातील संघटना एकत्रीत रित्या आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.यावेळी शेरजमा खान पठाण यांनी सर्वांचे आभार मानले रामभाऊ बादाडे यांनी प्रस्ताविक केले.

# 'मॅट'च्या ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मॅट) इतिहासात ३३ वर्षात प्रथमच लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोक अदालतीत ५४२ सेवा विषयक प्रकरणांपैकी १३८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष न्यायमूर्ती मृदुला भाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम यशस्वी करण्यात आला. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण आणि मुंबई उच्च न्यायालय विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोक अदालतीसाठी तीन पॅनल आयोजित करण्यात आले होते. पॅनल प्रमुख म्हणून न्यायमूर्ती विनय जोशी, सेवानिवृत्त सदस्य (न्या) ए. पी. कुऱ्हेकर, आर. बी. मलिक यांनी काम पाहिले. नितिन गद्रे (नागपूर), विजयकुमार (औरंगाबाद), विजया चौहान, संदेश तडवी, आर. एम. कोलगे आणि एम.बी. कदम यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. अदालतीत बरीच वर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची मुख्य सादरकर्ता अधिकारी स्वाती मणचेकर यांनी तपासणी केली. या लोक अदालतीमध्ये नागपूर, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर या तिन्ही खंडपीठातील ५४२ प्रकरणांपैकी १३८ निकाली निघाली. यामध्ये मुंबई खंडपीठाच्या-२३८ प्रकरणांपैकी ३९ तर नागपूर- खंडपीठाच्या १५० पैकी ६३ आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठाच्या १५४ प्रकरणांपैकी ३६ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

**तीन प्रकरणांमध्ये १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी**


लोक अदालतीत तीन प्रकरणात तडजोड झाल्याने १२६ अर्जदारांना शासकीय नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. जलसंधारण विभागाच्या १७१ आणि कृषि विभागाच्या २१८ जागा माजी सैनिकांसाठी आरक्षित होत्या. यामध्ये सर्व जागांसाठी माजी सैनिक उमेदवार मिळू शकले नाही. त्यामुळे लोक अदालतीत तडजोडीनंतर उर्वरीत रिक्त जागा इतर उमेदवारांना उपलब्ध करुन देण्यात आल्या. या निर्णयामुळे १२६ उमेदवारांना शासकीय नोकरी मिळू शकणार आहे. या निर्णयामुळे माजी सैनिकांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही.

लोक अदालत यशस्वी करण्यासाठी मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विभागातील सचिव यांच्यासह न्यायाधिकरणामधील सर्व अधिकारी, कर्मचारी, मुख्य सादरकर्ता अधिकारी, न्यायाधिकरण बार असोसिएशनमधील सर्व वकील, शासनाचे सर्व नोडल अधिकारी यांनी सहकार्य केले.

# केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण खुन प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होत असुन शेतकऱ्यांच्या अडाणी पणाचा फायदा घेत स्थानिक दलाल आणि बाहेर गावचे गुंड गोरगरीब शेतकऱ्यांना धमकावत शेतकऱ्यांना मावेजा अथवा नुकसान भरपाई न देताच पिकांचे नुकसान करत पोलिस प्रशासनाच्या मदतीने दादागिरी करत धमकावत असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासन यांना मिळुनही पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांची आर्थिक हितसंबंध जोपासत बाजु घेत असल्याचा आरोप अनेक तक्रारदारांनी केला आहे. यामुळे बीड जिल्ह्यात भविष्यकाळात नापिकी, कर्जबाजारीपणा याबरोबरच पवनचक्की कंपन्यांकडुन आर्थिक



फसवणूक हे सुद्धा शेतकरी आत्महत्येचं प्रमुख कारण पुढे येऊ शकते अशी भिती सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी व्यक्त केली असुन पोलिस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनाने वेळीच पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभाराला आवर घालुन शेतकऱ्यांचे रक्षण करावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना निवेदनाद्वारे केली आहे.

बालाघाटावरील चौसाळा परीसरातील गोलंग्री,कानडीघाट, सुलतानपूर येथील शेतकऱ्यांनी पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात आवाज उठवला असुन लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं रहाणं आवश्यक आहे. केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची पवनचक्की कंपन्यांच्या वादातुन दिवसाढवळ्या अपहरण करून झालेली निर्घृण हत्या कायदा व सुव्यवस्था ढासळल्याचे बीडचा बिहार होतोय की काय? अशी शंका उपस्थित करण्यासाठी पुरेशी आहे.

बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांकडून शेतकऱ्यांची आर्थिक लुट प्रकरणात पिडीत शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते योगेश क्षीरसागर आणि केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी पवनचक्कीचे काम करणाऱ्या आवादा कंपनी आणि संबंधित कंत्राटदार यांचा सहभाग असण्याची शक्यता असुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत अशी भूमिका घेणारे शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख सचिन मुळुक आणि स्वप्नील गलधर यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली.